विधान भवन
बॅकबे रेक्लमेशन
विधान भवन मार्ग
मुंबई ४०० ०३२

तारेचा पत्ता : विधानमंडळ
दूरध्वनी क्र. : २२०२ ७३ ९९
फॅक्स क्रमांक : २२०२ ४५ २४

# महाराष्ट्र विधानमंडळ

क्रमांक १८६६९/म.वि.स./ ई-2
दिनांक ८/१२/२०२१

प्रेषक :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति :

प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय : राज्यपालांनी ठरवून दिलेल्या वाटपाचा निर्देश, राज्य विधानमंडळापुढे सादर करावयाचे वैधानिक विकास मंडळनिहाय वार्षिक वित्तीय विवरणपत्र, विविध महामंडळांचे अहवाल यांची ऑनलाईन लिंक विधानमंडळाच्या साईटवर उपलब्ध करण्याबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयासंदर्भात निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, विविध महामंडळांचे अहवाल वित्त विभाग क्रमांक शासाउ १०१२/ प्र.क्र.२४/साउ, दिनांकित ३० जुलै, २०१२ च्या शासन निर्णयानुसार विधानमंडळास पुस्तिका व सी.डी.स्वरुपात सादर करण्यात येतात.

विधानमंडळाचे कामकाज कागद विरहित (Paperless) करण्याच्यादृष्टीने सदरहू अहवाल विधानमंडळाच्या सन्माननीय सदस्यांना विधानमंडळ सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात येतात.

अत: **विविध महामंडळांच्या वार्षिक अहवालांच्या बाबतीत फक्त अभिलेखापुरत्या आवश्यक तीन प्रती व दोन सी.डी. आणि वैधानिक विकास मंडळनिहाय वार्षिक वित्तीय विवरणपत्राच्या बाबतीत अभिलेखापुरत्या पाच प्रती उपलब्ध कराव्यात तसेच ऑनलाईन लिंक विधिमंडळ सचिवालयाच्या www.mls.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी,** याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना व राज्य सार्वजनिक उपक्रमांना कृपया आपल्या स्तरावर कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

(ऋतुराज ज.कुडतरकर)
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

याची प्रत :

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी
६) प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
७) संगणक कक्ष (website)